# University of Mumbai

**No.Aff./Recog.I/Admission (2014-15)/**

परिपत्रकः

सर्व कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेतील संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे लक्ष या कार्यालयाचे क्र.संलग्नता/मान्यता-१/प्रवेश (२०१४-१५)/६ दिनांक ३० मे २०१४ रोजीच्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्याअनुषंगाने त्यांना कळविण्यात येते प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.अशाम/२०१४/ आजीमाजीसैनिक/ आरक्षण/पुवि/मवि-२/ ६२६७ दिनांक २३ जुलै २०१४ नुसार कळविले आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमाजीसै-२००६/(२४१/०६)/ मशि-६ दिनांक १० सप्टेंबर २००७ अन्वये आजी-माजी सैनिकांच्या मुलांना शाळा/कॉलेज यामधील प्रवेशासाठी शासनाने विहित केल्यानुसार जागा आरक्षित ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहे. तसेच सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना शाळा/महाविद्यालयांमध्ये प्रवेश देतांना आरक्षणापासून वंचित ठेवण्यात आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्याचे कळविले आहे.

तरी सर्व संबंधीत प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद विद्यापीठाचे परिपत्रक व शासन परिपत्रक हे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्त्याखालील विधी (३ व ५ वर्ष )अभ्यासक्रमासह सर्व विद्याशाखांना लागू आहे. तेव्हा उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व महाविद्यालयांमध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये उपरोक्त आरक्षणाचा लाभ देण्याबाबत काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी व जी महाविद्यालये /संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांचेवर दिनांक १० सप्टेंबर २००७ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सोबत संदर्भीय पत्राची प्रत प्राचार्यांच्या अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

५ ऑगष्ट २०१४
मुंबई ४०० ०३२

( डॉ. एम.ए. खान )
कुलसचिव

प्रति,

सर्व कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेतील संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य

(अ) प्रत माहितीकरिता सविनय रवानाः

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
२. मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
३. श्रीमती उर्मिला जोशी, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

....२

(ब) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहिकरिता रवानाः

१. उपकुलसचिव, विशेष कक्ष
२. उपकुलसचिव, पदविपुर्व /पदव्युत्तर विभाग
३. उपकुलसचिव, जनसंपर्क
४. संचालक, म.वि.वि.मं. यांचे स्वीय सहायक
५. कुलसचिवांचे स्वीय सहायक

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय. (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in  E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९    फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्र.अशाम/२०१४/आजीमाजीसैनिक/आरक्षण/पुवि/मवि-२/ 18260    दि.

प्रति.

१. सर्व विभागीय सहसंचालक.
उच्च शिक्षण, पुणे.
२. संचालक. बी.सी.यु.डी.
(सर्व अकृषि विद्यापीठे)

3-C-UD
UNIVERSITY OF MUMBAI
30 JUL 2014
17289

**विषय : आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक आरक्षणाबाबत.**

संदर्भ : १. शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१३६ मशि-२, दि.२१/५/२०१४.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.माजीसै-२००६/(२४१/०६)/मशि-६, दि.१०/९/२००७.
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/२०११/माजीसैनिक/औचित्याचा मुद्दा/मवि-१, दि.४/८/२०११.

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन पत्रांचे अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.माजीसै-२००६/(२४१/०६)/मशि-६, दि.१०/९/२००७ अन्वये आजी-माजी सैनिकांच्या मुलांना शाळा/कॉलेज यामधील प्रवेशासाठी शासनाने विहित केल्यानुसार जागा आरक्षित ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना शाळा/महाविद्यालयांमध्ये प्रवेश देतांना आरक्षणापासुन वंचित ठेवण्यात आल्याची बाब शासनाच्या निर्देशनास आल्याचे कळविले आहे.

सदर शासन परिपत्रक हे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विधी अभ्यासक्रमासह सर्व विद्याशाखांना लागू आहे, तेव्हा उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील सर्व महाविद्यालयांमध्ये सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये उपरोक्त आरक्षणाचा लाभ देण्याबाबत काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी व जी महाविद्यालये/संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत त्यांचेवर दि.१०/९/२००७ रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात यावी असे ही संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये कळविण्यात आले आहे.

तसेच संचालनालयाचे संदर्भीय पत्र क्र.३ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना प्रवेश नियंत्रण समितीमार्फत आपल्या अधिनस्त असणाऱ्या महाविद्यालयांना देण्यात याव्यात असे कळविले आहे.

तरी आपल्या विभागातील व विद्यापीठ अखत्यारीत सर्व महाविद्यालयांमध्ये आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना प्रवेशासाठी लाभ देण्यासाठी शासन परिपत्रक दि.१०/९/२००७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

22/7/2014
(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

प्रत : १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. निवड नस्ती